सन २०१७-१८ करीता इको टुरि झम (राज्य) योजनेंतर्गत वनक्षेत्रातील पर्यटन स्थळांच्या विकास कामांकरिता निधी वितरण. (२४०६ २२९५)

महाराष्ट्र शासन

महसुल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांक : निसप-०३१८/ प्र.क्र.८५/फ- ५

मंत्रालय, मुंबई -४००० ०३२

दिनांक :- २९ मार्च, २०१८

वाचा - अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य,नागपूर यांचे पत्र क्रं. कक्ष-१/ पी/यो/नबाप्र/प्र.क्र.१५/२०७१/१७-१८,दि. ०१.०२.२०१८

प्रस्तावना -

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य नागपुर यांनी उपरोक्त पत्रान्वये सन २०१७-१८ करिता इको टुरीझम राज्य योजनेंतर्गत वनक्षेत्रातील पर्यटन स्थळांचा विकास या योजनेंतर्गत गडचिरोली वनवृत्तातील आलापल्ली येथील निसर्ग पर्यटन केंद्राच्या विकासा अंतर्गत नविन बाब प्रस्तावाचे कामासाठी रु. २१२.२३ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

शासन निर्णय दि. २८.०१.२०१६ अन्वये महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या उपविधी नियमांना मान्यता देण्यात आली असून त्यामध्ये व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळ, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या कार्यकारी समितीने प्रस्तावित पर्यटन स्थळाच्या विकास कामांना निधी उपलब्ध करुन देण्याची शिफारस केली आहे.

राज्य योजना सन २०१७-१८ करीता इको टुरीझम (राज्य) योजनेंतर्गत वनक्षेत्रातील पर्यटन स्थळांचा विकास (२४०६-२२९५) या योजनेअंतर्गत रू.८०००.०० लक्ष नियतव्यय मंजूर व अर्थसंकल्पित आहे. या निधीतून प्रस्तावित पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी निधी मंजुर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता

शासन निर्णय :-

अपर प्रधान मुख्य वन संरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य,नागपुर यांनी प्रस्तावित केल्यानुसार गडचिरोली वनवृत्त, आलापल्ली येथील खालील नमूद केलेल्या निसर्ग पर्यटन केंद्राच्या विकासा अंतर्गत नविन बाब प्रस्तावाचे कामासाठी रु.२१२.२३ लक्ष (रु.दोन कोटी बारा लक्ष तेवीस हजार फक्त)इतका खर्च करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये या कामांसाठी रु.२००.०० लक्ष (रु. दोन कोटी फक्त) निधी वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	कामाचा तपशिल	रक्कम (रु.लाखात)
१	चेनलिंक फेन्सिंग करणे	१२.७८
२	चेनलिंग फेन्सिंग करणे	१३.५६
३	सायकल ट्रक तयार करणे	२.४०
४	पांरपांरीक मातीचे घर बांधणे-१	७.९७
५	पांरपांरीक मातीचे घर बांधणे-२	७.९७
६	टेंट हाऊस बांधणे-१	७.७६
७	टेंट हाऊस बांधणे-२	७.७६
८	टेंट हाऊस बांधणे-३	७.७६
९	प्रवेशद्वाराचे बांधकाम करणे	५.९५
१०	वन विभागाच्या विश्रामगृहाभौवती सौंदर्यीकरण करणे	५.४०
११	बांबू कॅाटेजच्या भौवती सौंदर्यीकरण करणे	५.०९
१२	निसर्ग केंद्राच्या भौवती सौंदर्यीकरण करणे	५.०९
१३	बांबू कॉटेजच्या भौवती अंब्रेला बैठक व्यवस्था करणे	६.३०
१४	पर्यटन केंद्राच्या प्रवेशद्वाराचे बांधकाम करणे	१.६०
१५	निसर्ग पायवाट तयार करणे	२४.७७
१६	निसर्ग माहिती कक्षाचे बांधकाम करणे	२४.८७
१७	टिंबर म्युझीयमचे बांधकाम करणे	२४.६५
१८	पेव्हरब्लॉक बसविणे	२१.०४
१९	लाकडी झोपडया बांधणे	६.००
२०	लाकडी गजीबो पॅगोडा बांधणे	६.००
२१	मोठया छत्र्या व आराम खुर्चा खरेदी करणे	२.५०
२२	जनरेटरसह पथ दिव्यांची सुविधा	३.००
२३	उद्यानातील बेंचेसची खरेदी	२.५०
२४	फर्निचर खरेदी	४.३८
२५	कॅम्पिंग किट, इमरजन्सी लाईट, कॅमेरा इत्यादीची खरेदी	५.००
२६	दृकश्राव्य वस्तूंची खरेदी	३.००
२७	वन्य प्राण्यांच्या प्रतीकृती इत्यादीची खरेदी	६.००
२८	सौरउर्जा युनिट खरेदी	३.००
	एकूण	**२१२.२३**

सदरहू शासकीय मान्यता खालील अटींच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

१. उपरोक्त नमुद केलेली विकास कामे करण्यासाठी उपरोक्त निधी खर्ची टाकण्यात यावा.

२. शासन निर्णय दि. १ डिसेंबर २०१६ अनुसार नियम पुस्तिकेच्या परिच्छेद ४.१ मध्ये नमुद केल्यानुसार निविदा प्रक्रियेत खरेदी किंमत रु. तीन लाख व त्यापेक्षा अधिक असल्यास ई-निविदा प्रणालीचा वापर करावा.

३. उपरोक्त खर्च विहीत कार्यपद्धतीनुसार तसेच अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध मासिक निधी प्रवाहानुसार खर्च करण्यात यावा. यामध्ये कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. तसेच सदरहू विकासाची कामे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात पूर्ण करण्यात यावीत. सदरहू रक्कम खर्ची पडल्यानंतर त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

४. प्रस्तावित सर्व कामांना सक्षम प्राधिकारी यांची तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी आहे याची खात्री करुनच कामे करावीत. तसेच सदरहू कामे करताना वन (संवर्धन) कायदा १९८०, भारतीय वन अधिनियम १९२७, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ मधील तरतुदींचा भंग होणार नाही तसेच सर्वोच्च न्यायालय/उच्च न्यायालय/केंद्र शासनाच्या व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचना/आदेशांची अवहेलना होणार नाही याची सुद्धा दक्षता घ्यावी.

५. कार्यवाहीमध्ये खरेदीचा समावेश असल्यास शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दती अवलंब करुन खरेदी करण्यात यावी.

६. शासन निर्णयात नमुद कामासाठी इतर स्त्रोतातुन निधी घेण्यात येणार नाही व कामाची द्विरुक्ती होणार नाही याचे प्रमाणपत्र उपयोगिता प्रमाणपत्रासोबत द्यावे त्याशिवाय पुढील निधी उपलब्ध करुन दिला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

७. केंद्र शासन व राज्य शासनाचे निसर्ग पर्यटन धोरणाशी अनुकुल राहतील अशीच कामे कार्यान्वित करावी.

८. सदर प्रस्तावांतर्गत करावयाच्या कामाचा खर्च रु. २१२.२३ लक्ष (रुपये दोन कोटी बारा लक्ष तेवीस हजार फक्त) सन २०१७-१८ साठी मागणी क्र. सी-०७-२४०६ वनीकरण व वन्यजीवन, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०२) (०६) इको टुरिझम (राज्य) (२४०६-२२९५) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

९. वित्त विभागाने निर्गमित केलेल्या विविध मार्गदर्शक सूचनांचे व वित्त विभागाने जारी केलेल्या परिपत्रकांचे काटेकोर पालन करावे. यामध्ये वित्तीय अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी.

सदरहू शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.७५/अर्थ-३ दि.०६.०३.२०१८अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३३११२४९५८६२१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Vaishnav M N
Date: 2018.03.31 12:51:21 +05'30'

(म.न.वैष्णव)

कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग

प्रति,

(१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) , महाराष्ट्र राज्य, नागपूर
(२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) , महाराष्ट्र राज्य, नागपूर
(३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
(४) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळ, नागपूर.
(५) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), गडचिरोली.
(६) उप वनसंरक्षक,आलापल्ली
(७) महालेखापाल, १/२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरीक्षा), मुंबई/नागपूर.
(८) जिल्हा कोषागार अधिकारी, गडचिरोली.
(९)कक्ष अधिकारी (व्यय-१०)(विनियम)/, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
(१०) ब-१/फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग ,मंत्रालय, मुंबई.
(११) निवड नस्ती, फ-५